# सह आयुक्त(अन्न),(बृहन्मुंबई विभाग) यांचे कार्यालय.

अन्न व औषध प्रशासन (म. रा), सर्व्हे क्रमांक ३४१, रिझर्व्ह, बँकसमोर, बांद्रा – कुर्ला कॉम्प्लेक्स बांद्रा(पुर्व), मुंबई, पिन ४०० ०५१.

ईमेल – jcfoodgm@gmail.com फोन नं. ०२२ - 26592245


जा. क्र. असुमाका /बांधानी हिंग लिलाव/2075/२०२०

## जप्त अन्नपदार्थाच्या लिलावाची नोटिस

मा. पदावधित अधिकारी परिमंडळ ३ बृहन्मुंबई यांनी किरकोळ अर्ज क्र. १/२०२० मध्ये समाविष्ट असलेल्या खालील तपशिलाप्रमाणे नमूद जप्त अन्नपदार्थाची जाहिर लिलावाव्दारे विक्री करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार खालील नमुद अन्नपदार्थ जसे आहेत, जेथे आहेत व ज्या स्थितीत आहेत त्याप्रमाणे जाहीर निविदा मागुन विक्री करण्यात येणार आहेत. अन्न सुरक्षा मानदे कायदयांतर्गत वैध अन्न परवाना असलेल्या व्यक्ती/संस्था यांना सदरील निविदा लिलाव प्रक्रियेमध्ये भाग घ्यावयाचा आहे त्यांनी सिलबंद लिफाफ्यात र. रु. ५०,०००/- अनामत रक्कमेच्या डिमांड ड्राफ्ट सोबत वरील पत्त्यावर सदर जाहीरात प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत सादर करावी.

| अ.क्र | अन्नपदार्थाचे नाव | पॅकिंग साईज | वजन | बाजारभावाप्रमाणे किंमत (MRP नुसार) |
|---|---|---|---|---|
| १ | बांधानी हिंग (पिवळी हिंग पावडर) | २५ ग्रॅम वजनाचे एकुण २४००० **Pieces** | ६०० किलो | २४३६००/- |
| २ | बांधानी हिंग (पिवळी हिंग पावडर) | २५ ग्रॅम वजनाचे एकुण १२००० **Pieces** | ३०० किलो | १२१८००/- |
| ३ | बांधानी हिंग (हिंगराज पावडर) | ५० ग्रॅम वजनाचे एकुण २४००० **Pieces** | १२०० किलो | ६२०४००/- |
| ४ | बांधानी हिंग (loose) (हिंग पावडर) | ५० किलो वजनाचे एकुण ४२ **Bags** | २१०० किलो | ८५२६००/- |
| ५ | बांधानी हिंग (loose) (हिंग पावडर) | ५० किलो वजनाचे एकुण ३० **Bags** | १५००किलो | ६०९०००/- |
| ६ | बांधानी हिंग (loose)(Black) (हिंग पावडर) | ५० किलो वजनाचे एकुण ७६ **Bags** | ३८०० किलो | १९६४६००/- |

जप्त केलेल्या अन्नपदार्थाव्दारे विक्री करणेबाबतच्या अटी व शर्ती

१) वरील नमुद जप्त अन्नपदार्थात मोहरी तेल (Mustard Oil) चा वापर केला असल्याने अन्न सुरक्षा व मानदे कायदयातील नमुद मानदाप्रमाणे नसल्याचे घोषित झालेले आहेत. यामुळे सदर अन्नपदार्थ त्यातील नमुद घटक पदार्थासह अन्न सुरक्षा मानदे कायदयानुसार ज्या अन्नपदार्थात वापर करण्यास परवानगी आहे त्यामध्येच घटकपदार्थ म्हणुन वापर करता येतील. सदर जप्त अन्नपदार्थ कोणत्याही परिस्थितीत बांधानी हिंग (Compounded Asafoetida) म्हणुन विक्री करता येणार नाही. सदर जप्त अन्नपदार्थाचा वरील तपशिलाप्रमाणे वापर अन्न सुरक्षा अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करणे व त्याप्रमाणे अहवाल सादर करणे तसेच या संदर्भात त्यांनी अन्न सुरक्षा व मानदे कायदयातील तरतुदींची पुर्तता होण्यासाठी दिलेल्या निर्देशनाचे पालन करणे बंधन कारक राहील.

२) तीन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास सदर लिलाव पध्दत रदद करण्यात येईल व फेरनिविदासाठी नोटीस काढण्यात येईल.

३) खरेदीदार म्हणुन जाहीर करण्यात आलेल्या अर्जदाराने उर्वरीत सर्व रक्कम १५ दिवसांच्या आत न भरल्यास जप्त अन्नपदार्थ घेण्यास तो इच्छुक नाही असे गृहीत धरुन जमा करण्यात आलेली अनामत रक्कम कुठल्याही परिस्थितीत परत केली जाणार नाही व जप्त अन्नपदार्थ फेरलिलावाव्दारे विक्रीत काढण्यात येतील.

४) वरील अटी व शर्तीमध्ये फेरबदल करण्याचे व अतिरिक्त अटी शर्ती ठरविण्याचे सर्व हक्क या कार्यालयाने राखुन ठेवलेले आहेत. अधिक माहितीसाठी या कार्यालयास संपर्क साधावा. सदर निविदा www.fda.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर सुध्दा प्रसिध्द केलेली आहे.

(पी.एस.उन्हवणे) 04.9.20[illegible]
प्रशासकीय अधिकारी
अन्न व औषध प्रशासन (म.रा.), बृहन्मुंबई